अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

# नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

# रुपयाची किंमत घसरवण्यामागे काळे कारस्थान

निवडणुकीच्या धामधुमीत अनेक मुद्द्यांवर जवळपास सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी मते मांडली. परंतु सर्वात महत्त्वाचा जो काळ्या पैशाचा मुद्दा होता त्याकडे याच पक्षांनी सोयीस्करपणे दुर्लक्ष केले. भारतीय जनता पार्टीसारख्या पक्षाने या मुद्द्यावरून काँग्रेसला कोंडीत पकडायला हवे होते. कारण या देशावर सर्वाधिक काळ काँग्रेसची सत्ता होती. त्या काळातच भारतातून प्रचंड पैसा भारताबाहेर गेला आणि त्याकडे काँग्रेसच्या सरकारने दुर्लक्ष केले. त्यानंतर काही काळासाठी सत्तेवर आलेल्या भाजपाच्या म्हणजेच एनडीए सरकारनेसुध्दा या काळात पैसा प्रकरणाची फारशी दखल घेतली नाही. इतर एकही राजकीय पक्ष या काळ्या पैशाविषयी बोलायलासुध्दा तयार नाहीत. मोठमोठ्या भांडवलदारांच्या वृत्तवाहिन्या मोठमोठ्या कंपन्यांच्या जाहिरातींवर पोसली जाणारी भांडवलदारी वृत्तपत्रे एवढेच काय आंतरराष्ट्रीय पुरस्कार घेऊन आपल्या समाजकार्याची दवंडी पिटणाऱ्या स्वयंसेवी संस्थासुध्दा याच काळ्या पैशाच्या मुद्द्यावर एका शब्दानेसुद्धा बोलायला तयार नाहीत.आणि देशाचा काहीच संबंध नाही असा आव ही सर्व मंडळी आणत असतात.एरवी छोट्या मोठ्या मुद्द्यांवर तोंड फाटेपर्यंत चर्चा करणारे आरोप-प्रत्यारोप करणारे भ्रष्टाचार नाहीसा करा म्हणणारे, भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर काढून सत्यवानाचे अवतार असल्याचे भासवणारे सामाजिक आणि राजकीय नेते कार्यकर्ते या इतक्या गंभीर राष्ट्रीय प्रश्नाबाबत तोंडात मिठाची गुळणी धरून बसतात. यामागचे गुढ काय, यामागे कोणते रहस्य दडलेले आहे, हे शोधण्याची वेळ आली आहे. सगळ्या देशाची संपत्ती मूठभर लुटून नेतात. परदेशी बँकांमध्ये ठेवतात. स्वत:च गरीब कंगाल होतात. इतका निर्लज्जपणा ते करतात याचाच अर्थ त्यांचा तर त्यात लाभ असतोच परंतु सत्ताधारी सरकार आणि राजकीय सामाजिक संघटनांचेही आर्थिक हितसंबंध त्याच्याशी निगडित असले पाहिजेत. त्याशिवाय अशा सगळ्यांची या एकाच मुद्द्याबाबत अशी तोंडे शिवली जाण्याचे काही कारणच उरत नाही. पण आज तरी तशीच परिस्थिती आहे. देशाच्या भल्याच्या लंब्या चवड्या गप्पा मारणारे हे ढोंगी राजकारणी काळा पैसा शोधून काढू आणि सत्तेवर आल्यावर सहा महिन्यांत तो भारतात आणू असे आश्वासनसुध्दा द्यायला तयार नाही. सरकार किंवा राजकीय नेत्यांना याबाबत कोंडीत पकडायला विरोधी पक्ष तयार नाहीत. पण या सगळ्या लबाड आणि बनेल राजकारण्यांना या विषयावर रोखठोख भूमिका घ्यायला लावण्यात देशातली प्रसारमाध्यमेसुध्दा उदासीन राहावीत हे केवढे मोठे दुर्दैव आहे.

### मोदी आल्यावर रुपया वधारणार

आता यासंदर्भात अशीही चर्चा सुरू झाली की, भारतात रुपयाचा भाव घसरण्यामागेदेखील एक मोठे षड्यंत्र आहे. कधी नव्हे तो इतकी रुपयाची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात कमी झाली आणि हे सगळे बरोबर निवडणुकीपूर्वीच कसे काय घडले.गेल्या दहा वर्षांत रुपयाची किंमत आंतरराष्ट्रीय बाजारात कमी होत होती. डॉलरच्या तुलनेत रुपया हळूहळू घसरत होता. परंतु गेल्या वर्षी केवळ एकाच महिन्यात रुपया एकदम ६० पैशापर्यंत दणकन घसरावा. २०१० ते २०१३ पर्यंत रुपयाची किंमत तब्बल २८ टक्क्यांनी कमी झाली. गेल्या ऑगस्ट महिन्यात रुपया सर्वाधिक खाली आला. आशिया खंडातल्या प्रमुख १२ आशियन चलन किंवा करन्सीज आहेत. त्या १२ मध्ये सर्वाधिक घसरण रुपयांची म्हणजेच भारतीय चलनाची नोंदली गेली. असे होण्याची अनेक आर्थिक कारणे दिली गेली. परंतु आता हळूहळू जी थोडीफार माहिती बाहेर येते आहे त्याची जर नीट शहानिशा झाली तर डॉलरच्या तुलनेत रुपयांची किंमत कमी करण्यामागे एक मोठे राजकीय कारस्थान असावे अशी शक्यता वर्तवली जात आहे. निवडणुकीपूर्वीच योग्यवेळ साधून रुपया घरवण्यात आला. कोणत्याही आर्थिक परिस्थितीमुळे तो घसरला नाही, त्याला जाणूनबुजून घसरवला गेला त्यामागे दोन प्रमुख कारणे सांगितली जात आहेत. एक म्हणजे निवडणुकीत काळा पैसा भारतात आणता यावा. डॉलरच्या चढ्या भावात तो आणला की जास्त फायदा करून घेता येईल.नवे सरकार आल्यावर काळ्या पैशावर संक्रांत येईल तेव्हा तो वाया घालवण्यापेक्षा रुपयाला कमजोर करायचे व डॉलरचा भाव वाढवायचा आणि हाच काळा पैसा या धामधुमीत परदेशातून हलवायचा असे एक महत्त्वाचे कारस्थान त्यामागे असण्याची शक्यता व्यक्त होऊ लागली आहे. अन्यथा निवडणुकीच्या बरोबर सहा ते आठ महिने आधी रुपयाला एवढी मोठी घरघर लावण्याचे काहीच कारण नव्हते.

### भारतीय माल स्वस्तात

याबाबतीत २० मार्चच्या एका प्रसिध्द इंग्रजी वृत्तपत्रात वृत्त प्रसिध्द झाले होते. त्यात नरेंद्र मोदी जर पंतप्रधान झाले तर रुपयाची किंमत ३५ टक्क्यांनी वाढेल. म्हणजेच डॉलरच्या तुलनेत रुपयाची किंमत ४० पैसे होईल अशी अपेक्षा व्यक्त केली गेली होती. सिटी ग्रुपचे एशिया पॅसिफिक विभागाचे प्रमुख असलेल्या आणि अर्थतज्ज्ञ मानल्या जाणाऱ्या ॲडम गिलमोर यांनी सत्तांतरानंतर काय आर्थिक घडामोडी होतील याचे विश्लेषण त्यात केले होते. जर मोदी पंतप्रधानपदी आल्यानंतर रुपयाचा भाव वाढू शकतो आणि मनमोहन सिंगांसारख्या अर्थतज्ज्ञ पंतप्रधान असलेल्या व्यक्तीच्या काळात रुपया कमजोर होतो, याचा अर्थच रुपयाची घसरण ही आर्थिक नसून राजकीय आहे हे स्पष्ट होते. याच वृत्ताचा अधिक मागोवा घेतला तर आशिया परिसरातल्या १२ देशांच्या चलनाला कोणताच धक्का बसत नाही आणि भारताच्या चलनी रुपयाचा मात्र कडेलोट होतो. यावरून त्यामागे एक निश्चित खेळी खेळली गेल्याची शंका आल्यावाचून राहत नाही. कारण सत्तांतर होणे किंवा मोदी पंतप्रधान होण्याचे संकेत मिळू लागल्याबरोबर काळा पैसेवाल्यांचे धाबे दणाणले होते. मोदी आल्यानंतर हा पैसा भारतात आणण्याच्या आणि तो लपविणाऱ्यांना शोधण्याच्या हालचाली सुरू होतील. हे लक्षात घेऊन ही घाईगर्दी केली गेली.अन्यथा गेल्या दहा वर्षांत रुपया कधीही एवढा घसरला नाही तो इतक्या खाली येऊन आदळण्याची शक्यता नव्हती. अर्थात मग यासोबत मनमोहन सिंग आणि अमेरिका यांचे घनिष्ट संबंध आहेत. जाता जाता अमेरिकेचे उतराई होण्यासाठीसुध्दा रुपयाची अक्षरश: चांदी झाली आणि अनेक देशानांही भारतातला माल स्वस्तात पदरात पाडून घेता आला. हेही त्यामागचे दुसरे महत्त्वाचे कारण सांगितले जाते. अन्यथा निवडणुका झाल्यानंतर लगोलग रुपयांचा भाव वाढेल असेही होण्याचे कारण नव्हते. परंतु सत्तेतले लोक आंतरराष्ट्रीय आर्थिक समीकरणे कशी वेगवेगळ्या पध्दतीने कमी करत असतात हे या निमित्ताने उघड झाले.